**रोजगार मेळावे आयोजित करताना होणाऱ्या खर्चामध्ये सुधारणा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
रोजगार व स्वयंरोजगार विभाग,
शासन निर्णय कमांक : रोस्वरो-२००७/प्र.क्र.४१/रोस्वरो-१,
नवीन प्रशासकीय भवन, १४ वा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक ४ फेब्रुवारी, २०१०.

वाचा :- १) शासन निर्णय रोजगार व स्वयंरोजगार विभाग क्र.धोरण-२०००/प्र.क्र.१५८/ रोस्वरो-१, दिनांक ६ ऑक्टोबर, २०००.
२) शासन निर्णय क्र. रोजगार व स्वयंरोजगार विभाग क्र. रोस्वरो-२००७/ प्र.क्र.४१/रोस्वरो-१, दिनांक २९ जून, २००७
३) शासन निर्णय क्र. रोजगार व स्वयंरोजगार विभाग क्र. रोस्वरो-२००७/ प्र.क्र.४१/रोस्वरो-१, दिनांक १३ ऑगस्ट, २००९
४) आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय, नवी मुंबई यांचे पत्र क्रमांक :रोस्वसं-८/धोकाप /११२३९, दिनांक २८ सप्टेंबर, २०१०

**प्रस्तावना :-**

शासनाच्या रोजगार व स्वयंरोजगार धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी नियोक्ते, कारखानदार, व्यापारी व सुशिक्षित बेरोजगार यांचे एकत्रित रोजगार मेळावे आयोजित करण्यात येत आहेत. या रोजगार मेळाव्यांची प्रभावीपणे अमंलबजावणी करण्याच्या दृष्टीने जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती, औद्योगिक विकास इत्यादी बाबींमुळे प्रती मेळावा रु.३७,०००/- इतक्या मर्यादेपर्यंतच्या खर्चात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

रोजगार मेळावे आयोजित करण्याबाबत संदर्भाधीन क्र.२ येथील दिनांक २९ जून, २००७ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या खर्चाच्या मर्यादेत सुधारणा करण्यात येत असून विभागीय व जिल्हा स्तरावरील प्रति मेळावा कमाल खर्च करण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर खर्चाचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे :-

## विभागीय स्तरावरील रोजगार मेळाव्यास येणाऱ्या बाबनिहाय खर्चाचा तपशिल

| अ.क्र. | तपशील | अपेक्षित कमाल खर्च (रुपये) |
|---|---|---|
| १ | मेळाव्याकरिता बंदीस्त दालन, (हॉल)/खुले मैदान व त्यातील सुविधा त्याचे भाडे (उदा. मंडप, खुर्च्या, टेबल, पार्टीशन, ध्वनिक्षेपन इ.) | ३०,००० |
| २ | कार्यक्रमपत्रिका छपाई, हॅन्ड बिल्स, भित्तीपत्रके, फलक, बॅनर्स, छायाचित्रण इ. (पब्लिसीटी साहित्य) | १०,००० |
| ३ | बेरोजगार उमेदवार व उद्योजकांना पाठविण्यात येणाऱ्या पत्रांसाठी टपाल खर्च | २०,००० |
| ४ | कार्यालयात लागणारी स्टेशनरी इ. | ५,००० |
| ५ | भाड्याने वाहनाचा खर्च/प्रवास खर्च | २०,००० |
| ६ | अल्पोपहार स्वागत, इ. खर्च | ५,००० |
| ७ | तज्ज्ञांना देण्यात येणारे मानधन | ५,००० |
| ८ | इतर आकस्मिक खर्च | ५,००० |
| | एकूण | १००,००० |

## जिल्हा स्तरावरील रोजगार मेळाव्यास येणाऱ्या बाबनिहाय खर्चाचा तपशिल

**(अ) मुंबई शहर/मुंबई उपनगर/ठाणे/पुणे/कोल्हापूर/नाशिक/औरंगाबाद/लातूर/नांदेड/अमरावती/नागपूर/चंद्रपूर या जिल्ह्यांकरीता**

| अ.क्र. | तपशील | अपेक्षित कमाल खर्च (रुपये) |
|---|---|---|
| १ | मेळाव्याकरिता बंदीस्त दालन, (हॉल)/खुले मैदान व त्यातील सुविधा त्याचे भाडे (उदा. मंडप, खुर्च्या, टेबल, पार्टीशन, ध्वनिक्षेपण इ.) | १५,००० |
| २ | कार्यक्रमपत्रिका छपाई, हॅन्ड बिल्स, भित्तीपत्रके, फलक, बॅनर्स, छायाचित्रण इ. (पब्लिसीटी साहित्य) | ७,००० |
| ३ | बेरोजगार उमेदवार व उद्योजकांना पाठविण्यात येणाऱ्या पत्रांसाठी टपाल खर्च | १०,००० |
| ४ | कार्यालयात लागणारी स्टेशनरी इ. | ३,००० |
| ५ | भाड्याने वाहनाचा खर्च/प्रवास खर्च | १५,००० |
| ६ | अल्पोपहार स्वागत, इ. खर्च | ३,००० |
| ७ | तज्ज्ञांना देण्यात येणारे मानधन | ४,००० |
| ८ | इतर आकस्मिक खर्च | ३,००० |
| | एकूण | ६०,००० |

**(ब) अलिबाग/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/सातारा/सांगली/सोलापूर/जळगाव/धुळे/अहमदनगर/बीड/जालना/ नंदूरबार/ उस्मानाबाद/वर्धा/ हिंगोली/परभणी/ यवतमाळ/वाशिम/ बुलढाणा/अकोला/ भंडारा/गोंदिया/ गडचिरोली या जिल्ह्यांकरीता**

| अ.क्र. | तपशील | अपेक्षित कमाल खर्च (रुपये) |
|---|---|---|
| १ | मेळाव्याकरिता बंदीस्त दालन, (हॉल)/खुले मैदान व त्यातील सुविधा त्याचे भाडे (उदा. मंडप, खुर्च्या, टेबल, पार्टीशन, ध्वनिक्षेपण इ.) | १०,००० |
| २ | कार्यक्रमपत्रिका छपाई, हॅन्ड बिल्स, भित्तीपत्रके, फलक, बॅनर्स, छायाचित्रण इ. (पब्लिसीटी साहित्य) | ५,००० |
| ३ | बेरोजगार उमेदवार व उद्योजकांना पाठविण्यात येणाऱ्या पत्रांसाठी टपाल खर्च | ५,००० |
| ४ | कार्यालयात लागणारी स्टेशनरी इ. | ३,००० |
| ५ | भाड्याने वाहनाचा खर्च/प्रवास खर्च | १०,००० |
| ६ | अल्पोपहार स्वागत, इ. खर्च | २,००० |
| ७ | तज्ज्ञांना देण्यात येणारे मानधन | ३,००० |
| ८ | इतर आकस्मिक खर्च | २,००० |
| | एकूण | ४०,००० |

२. आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय यांच्या मान्यतेने विभागीय स्तरावरील/जिल्हास्तरावरील रोजगार मेळाव्याबाबत उपरोक्त बाबींवरील खर्चामध्ये आवश्यकतेनुसार एकूण खर्चाच्या मर्यादेत उपसंचालक/सहायक संचालक हे फेरबदल करु शकतील. या रोजगार मेळाव्यांसाठी शक्यतो शासकीय/निमशासकीय विभाग व अनुदानित संस्थांचे दालन मिळविण्यात यावे जेणेकरुन दालनाच्या भाड्याचा खर्च वाचू शकेल.

३. वरील खर्चामधील बदल हे शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

४. सदर मेळाव्यावर होणारा खर्च हा मागणी क्र. झेडए-१, २२३०-कामगार व सेवायोजन, ०२ सेवायोजन, ००४ संशोधन, सर्वेक्षण व सांख्यिकी, (०१) (०१) सेवायोजन रोजगार उपलब्धताविषयक माहिती व युवक रोजगारविषयक सेवा (२२३० ११०७), ३४ शिष्यवृत्या व विद्यावेतने या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौचारिक संदर्भ क्र. ४४/११/व्यय-६ दि. २०/०१/२०११ नुसार त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०११०२०४१८५४१४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(वि. रा. शिरसाट)
शासनाचे उप सचिव

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा. सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव,
मा. मुख्य सचिव,
सर्व मा.विधानसभा सदस्य/
मा.विधानपरिषद सदस्य,
सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव,
वित्त विभाग (अर्थसंकल्प-२०/अर्थसंकल्प-३ व्यय-६),
नियोजन विभाग (कार्यासन १४४३),
सर्व मंत्रालयीन विभाग,
आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय महाराष्ट्र राज्य, कोकणभवन, नवी मुंबई,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परिक्षा), मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परिक्षा), नागपूर,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व उपसंचालक, रोजगार व स्वयंरोजगार, विभागीय मुख्यालये,
सर्व सहायक संचालक/जिल्हा रोजगार स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी,
रोजगार व स्वयंरोजगार विभागातील सर्व कार्यासन अधिकारी,
निवड नस्ती (रोस्वरो-१).